# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः31.01.2026** **वारःशनिवार**

1. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी आज बैठक
2. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणाचा तपास सीआयडीकडे.
3. राज्यात आतापर्यंत 71 लाख मेट्रिक टन साखरेचं उत्पादन
4. राज्यात महानगरपालिकांच्या महापौर निवड प्रक्रियेला वेग आणि
5. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात आज वीस षटकांचा पाचवा आणि अंतिम सामना

**राजकीय घडामोडी-मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसनं आज विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली आहे. त्यात विधीमंडळ पक्षनेत्याची निवड होईल, अशी माहिती पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी दिली आहे. या बैठकीत विधिमंडळ पक्ष नेता निवडीचा निर्णय झाला, तर तातडीनं शपथविधी होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर उपमुख्यमंत्रीपद, तसंच त्यांच्याकडे असलेली खाती कुणाकडे सोपवली जाणार, याबाबत सर्वच प्रसारमाध्यामतून चर्चा सुरू आहेत, या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. विधिमंडळ नेतेपदी सुनेत्रा पवार यांची निवड व्हावी, अशी अनेकांची भावना असून, ही मागणी रास्त असल्याचं छगन भुजबळ यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्रिपदाविषयी सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा करून निर्णय घेऊ, असं राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे. तर याबाबत पक्षाच्या सर्व आमदारांना बोलवून त्यांच्याशी चर्चा करून, जनभावनेचा आदर करून आम्हाला निर्णय घ्यायचा आहे, तो लवकरच घेऊ, हे आम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितलं, अशी माहिती प्रफुल्ल पटेल यांनी दिली.

**अजितदादा-सीआयडी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाकडं अर्थात सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे. विभागानं या माहितीला दुजोरा दिला आहे. गेल्या बुधवारी बारामती विमानतळावर उतरत असताना या विमानाचा अपघात होऊन अजित पवार यांच्यासह 5 जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली होती.

**नियुक्ती**

राज्याच्या गृहविभागाच्या अपर मुख्य सचिवपदी मनिषा पाटणकर-म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आय. एस. चहल यांच्या सेवानिवृत्तीमुळे हे पद रिक्त होत आहे. चहल यांच्या निवृत्तीनंतर मनिषा पाटणकर-म्हैसकर हा पदभार स्वीकारतील. मनिषा म्हैसकर सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव आहेत. त्यांच्या जागी मिलिंद म्हैसकर यांच्या नियुक्तीचा आदेश जारी करण्यात आला आहे.

**महात्मा गांधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 78व्या पुण्यतिथीनिमित्त काल देशभरात त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत राजघाट इथं महात्मा गांधीजींच्या समाधीस्थळी जाऊन आदरांजली अर्पण केली. यावेळी सर्वधर्म प्रार्थनासभेचं आयोजनही करण्यात आलं होतं. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनीही राजघाटावर महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत विधानभवनातल्या गांधीजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली. महात्मा गांधी यांची पुण्यतिथी हुतात्मा दिन म्हणून पाळली जाते. यानिमित्त राज्यात सर्वत्र महात्मा गांधीजी आणि देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

**अर्थसंकल्प**

2026-27 या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प उद्या म्हणजेच 1 फेब्रुवारी रोजी सादर होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग नवव्यांदा लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

**ऊस गाळप**

राज्यातील ऊस गाळप हंगाम सध्या जोमात असून साखर उत्पादन, गाळपाची गती आणि हंगामाच्या समाप्तीबाबत साखर आयुक्तालयाकडून माहिती देण्यात आली आहे.....ऐकुयात अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**राज्यात सद्यस्थितीत 777 लाख 41 हजार 466 मेट्रिक टन ऊस गाळप पूर्ण झालं आहे. तर 9 पूर्णांक 1 टक्के निव्वळ उताऱ्यानुसार साखरेचे 71 लाख मेट्रिक टन इतके उत्पादन झालेलं आहे. राज्यातील 206 साखर कारखान्यांकडून प्रतिदिन 10 लाख 43 हजार 550 मेट्रिक टन ऊसगाळप सुरू असून हंगाम जोमाने सुरु आहे. मंत्री समितीच्या ऑक्टोबर 2025 मध्ये झालेल्या बैठकीत यंदाच्या 2025-26 च्या हंगामात ऊस पीक उपलब्धता, साखर उत्पादन, उतारा या संदर्भातील माहितीचा अहवाल साखर आयुक्तालयाकडून मांडण्यात आला होता. राज्यात यंदा किमान 1200 लाख मेट्रिक टन उसाचे गाळप हंगाम पूर्व अंदाजानुसार गृहित धरण्यात आले होते. अद्यापही 400 लाख मेट्रिक टनाच्या आसपास ऊस गाळप बाकी असून हंगामअखेरीस राज्यात साखरेचे एकंदर 105 लाख मेट्रिक टन इतक्या उत्पादनाचा अंदाज आहे. सध्याची ऊस गाळप क्षमता विचारात घेतल्यास शिल्लक उसाचे गाळप हे फेब्रुवारी महिनाअखेर किंवा 10 मार्चपर्यंत चालून यंदाचा हंगाम संपुष्टात येण्याची अपेक्षा असल्याचं साखर आयुक्तालयाचे साखर सह संचालक महेश झेंडे यांनी सांगितलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरु यांच्यासह प्रशांत जाधव, पुणे.**

**महापौर निवड**

**पुणे** महापालिकेत भारतीय जनता पक्षाच्या गटनेतेपदी गणेश बिडकर यांची निवड करण्यात आली आहे. महापौर निवडीनंतर, बिडकर सभागृहनेते होतील. काँग्रेसच्या गटनेतेपदी नगरसेवक ॲडव्होकेट रामचंद्र कदम यांची निवड करण्यात आली आहे. पुणे महापालिकेची महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक येत्या 9 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता होणार आहे. या पदांसाठी 3 फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येतील. **अकोला** महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या शारदा खेडकर तर, उपमहापौरपदी भाजपाचे अमोल गोगे यांची निवड झाली आहे. शहर विकास आघाडीच्या शारदा खेडकर यांना 45 मतं मिळाली, तर महाविकास आघाडीच्या सुरेखा काळे यांना 32 मतं मिळाली. काँग्रेस आघाडीत गेलेले भाजपाचे बंडखोर अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांनी भाजपाला पाठिंबा दिला. एम आय एम चे तीन नगरसेवक तटस्थ राहिले.

**ठाणे, कल्याण- डोंबिवली आणि उल्हासनगर** महापालिकांमधे महापौरपद शिवसेनेला तर उपमहापौरपद भाजपाला मिळालं आहे. त्यानुसार ठाण्यात शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर यांनी महापौरपदासाठी आणि भाजपाचे कृष्णा पाटील यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केले. कल्याण डोंबिवलीमधे शिवसेनेच्या हर्षाली थविल- चौधरी यांनी महापौरपदासाठी तर भाजपाचे राहुल दामले यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केला. उल्हासनगरमधे शिवसेना पुरस्कृत उमेदवार अश्विनी निकम यांनी महापौर म्हणून तर भाजपाचे अमर लुंड यांनी उपमहापौर म्हणून उमेदवारी अर्ज भरले. या सर्वांची निवड बिनविरोध होणार असून येत्या 3 फेब्रुवारीला त्याची अधिकृत घोषणा होईल.

**वसई - विरार** महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदासाठी येत्या 3 फेब्रुवारीला निवडणूक होणार असून महापौरपदासाठी 4 तर उपमहापौरपदासाठी 3 जणांनी अर्ज दाखल केले. **नवी मुंबई** महानगरपालिकेत महापौर आणि उपमहापौरपदासाठी येत्या 5 फेब्रुवारीला होईल.

**नाशिक, धुळे, अहिल्यानगर आणि जळगाव** महानगरपालिकेत 6 फेब्रुवारीला तर मालेगावमधे 7 फेब्रुवारीला निवडणूक होईल. जळगाव महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदासाठी भाजपकडून प्रत्येकी 6 अर्ज काल दाखल झाले. शिवसेनेकडूनही महापौरपदासाठी 2 तर उपमहापौरपदासाठी 2 अर्ज घेण्यात आले. **लातूरमधे** 9 फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. छत्रपती संभाजीनगर आणि चंद्रपूर महापालिकेत महापौर आणि उपमहापौरपदासाठी निवडणूक 10 फेब्रुवारीला होणार आहे. नागपूर महानगरपालिकेच्या महापौरांची निवडणूक येत्या 6 फेब्रुवारी रोजी होणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड संघांमधील 20 षटकांच्या क्रिकेट मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना आज संध्याकाळी 7 वाजता तिरुअनंतपुरम इथं खेळला जाईल. भारताने यापूर्वीच मालिकेत विजयी आघाडी घेतली असून मालिकेचा शेवटदेखील विजयाने करण्याचा दोन्ही संघ प्रयत्न करतील. यानंतर 7 फेब्रुवारीपासून वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.